


दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित. ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २४३ वा ▶ गुरुवार दि. २९ जून २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### कत्तलीच्या इराद्याने गोवंशाची वाहतूक

**धुळे ।** मुंबई-आग्रा महामार्ग क्र.३ वरील चाळीसगावचौफुलीवरून एका ट्रकमधून होणारी गोवंशाची वाहतूक चाळीसगावरोड पोलिसांनी उघड केली. या कारवाईत एकूण ५ लाख ८६ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला. चाळीसगावरोड पोलीस स्टेशनचे पो.कॉ.देवेंद्र तायडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२७ जून रोजी रात्री दीड वाजेच्या सुमारास चाळीसगाव चौफुलीवरून एम.एच.१८/ एए १२६८ क्रमांकाच्या ट्रकचा संशय आल्याने त्यास थांबविले असता या ट्रकमधून कत्तलीच्या इराद्याने गोवंशाची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. चालकाकडे चौकशी केली असता त्याचेकडे कुठलाही ठोस पुरावा आढळून आला नाही. या कारवाईत ५ लाखाच्या ट्रकसह ८६ हजारांची ९ गोवंश मिळून एकूण ५ लाख ८६ हजार रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

### शिरपूर येथे बस चालकास मारहाण

**धुळे ।** शिरपूर येथील बसस्थानक आवारात बस वाहक दिनेश बन्सीलाल बैसाणे (५२) रा.नगाव ता. धुळे, यांना प्रवीण नाना सत्तेसा रा. वाघाडी ता. शिरपूर, याने तू नेहमी लांब पल्ल्याच्या ड्युटी का करतो, असे बोलला. यावर दिनेश बैसाणे यांनी तुला काय करायचे आहे, असे सांगितले. याचा राग आल्याने प्रवीण सत्तेसा याने दिनेश बैसाणे यांना हाताबुक्यांनी मारहाण केली. तसेच बसच्या ल्युमिनिअमचा तुटलेल्या पत्र्याने दिनेश बैसाणे यांना मारुन जखमी केले. तसेच शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी प्रवीण सत्तेसा याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धुळेकर जनतेला नागरी सुविधा देण्यात मनपा अपयशी : आ.फारूक शाह

**धुळे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून मनपातील सत्ताधारी भाजप आणि एमआयएमचे आमदार फारूक शहा यांच्यात शाब्दिक चकमक उडाली आहे. परंतु, आरोपांचे शिंतोडे उडविण्याऐवजी आता नागरी सुविधांच्या मुद्द्यावर भाजपेयींना घेरण्याची तयारी आ. फारूक शाह यांनी केली आहे.

येत्या सोमवारी ३ जुलै रोजी महापालिकेविरोधात आमदार शाह उपोषण करणार आहेत. यासंदभात आ. शाह यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, धुळे महानगरपालिका धुळेकर जनतेला मुलभूत सुविधा देण्यात अकार्यक्षम ठरली आहे. शहरातील काही भागात १० ते ११ दिवसांनी पाणी दिले जात आहे. अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेमार्फत एकदिवसाआड पाणी दिले जाईल, हे आश्वासन देखील हवेत विरले आहे.

कचरा संकलन करण्यात मनपा पूर्णपणे अपयशी ठरल्यामुळे धुळे शहरातील प्रमुख चौकात कचर्याचे ढीग साचलेले आहेत. पावसाळ्याच्या तोंडावर साथरोग नियंत्रण बाबत मनपाची कुठलीच तयारी नाही. शहरातील स्वच्छतेचा प्रश्न अत्यंत बिकट झालेला आहे. धुळे शहरातील नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालयं बांधण्यात आलीत. त्यासाठी देखभाल दुरुस्ती करणेसाठी ठेकदार नेमण्यात आले. मात्र गेल्या ८-१० दिवसांपासून शहरातील सर्व शौचालयं बंद पडली आहेत. या संदर्भात नागरिकांनी तक्रार केल्यावर मनपा प्रशासन उत्तर देते की, व्यक्तिगत शौचालयासाठी निधी देण्यात येईल. परंतु, व्यक्तिगत शौचालय बांधेपर्यंत नागरिकांनी काय करावे ? असा सवालही आ. फारूक शाह यांनी मनपा प्रशासनाला विचारला आहे. ३ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण केले जाईल; असेही आ. शाह यांनी कळविले आहे.






### दैनिक लक्ष महाराष्ट्र वृत्तपत्राची दखल

दैनिक लक्ष महाराष्ट्र वृत्तपत्राने सलग सार्वजनिक शौचालयांची दुरावस्था याबाबत मालिका लावून मनपाचे लक्ष विधानाचे काम करत आहे. व्यक्तिगत शौचालयासाठी निधी देण्यात येईल. परंतु, व्यक्तिगत शौचालय बांधेपर्यंत नागरिकांनी काय करावे ? असा सवालही आ. फारूक शाह यांनी मनपा प्रशासनाला विचारला आहे. एकंदरीत मनपा नागरी सुविधा देण्यास अपयशी ठरल्याने ३ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण केले जाईल; असेही आ. शाह यांनी कळविले आहे.

## युपीतून आरोपीला बेड्या, ५० लाखांचे दागिने हस्तगत

### एलसीबीची कामगिरी, पार्सल चोरीची उकल

**धुळे । प्रतिनिधी**

नाशिक येथून बसमध्ये बसलेल्या डिलेव्हरी बॉयकडील सोने-चांदीच्या दागिण्यांचे पार्सल चोरीच्या किचकट गुन्ह्याची धुळे शहर पोलिस व एलसीबीच्या पथकाने उकल केली आहे. थेट उत्तरप्रदेशात जावून दोन आरोपींना बेड्या ठोकल्या असून त्यांच्याकडून गुन्ह्यातील ४९ लाख ३६ हजार ७१५ रूपये किंमतीचे सोने-चांदीचे दागिने व गुन्हयात वापरलेली आठ लाखांची कार हस्तगत करण्यात आली. पथकाच्या कामगिरीची माहिती पोलिस अधिक्षक संजय बारकुंड यांनी पत्रपरिषदेत दिली. तसेच कामगिरीचे कौतूक करीत पथकाला दहा हजाराचे रिवार्ड जाहिर केला.

जयबजरंग कुरीयरचा डिलेव्हरी बॉय गोविंद रघुनाथसिंह सिकरवार हा दि.१४ जुन रोजी पहाटे ५.३० वाजता नासिक येथून धुळे येथे सोने चांदीचे दागिण्यांचे पार्सल घेवून साडेआठ वाजता धुळे येथे आला. दरम्यान त्याला बसमध्ये गाड झोप लागल्याने अज्ञात चोरट्यांनी दागिन्यांचे पार्सलची बॅग चोरून नेली. त्यात ६४ लाख ८० हजार २५३ रुपये किंमतीचे सोने चांदीचे दागिने होते. याबाबत विष्णुसिंह निनुआ सिकरवार (रा.काळबादेवी, मुंबई) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींवर धुळे शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयाचे तपासात तांत्रीक माहितीच्या आधारे सपोनि चंद्रकांत पाटील, पोहेकॉ विजय शिरसाठ, पोना कुंदन पटाईत, पोकाँ महेश मोरे, मनिष सोनगीरे यांनी नासिक, धुळे या ठिकाणाचे फुटेज, तांत्रीक तपासणी करुन, गुन्हयात आरोपी मनोज कुमार राजेंद्रसिंग सिसोदीया (रा. आग्रा, उत्तर प्रदेश), मयंक कुमार आनंदकुमार गुप्ता (रा. फिरोजाबाद उत्तरप्रदेश), पुष्पेंद्रसिंग शिवसिंग तोमर राजपुत (रा.धोलपुर राजस्थान) व राहुल राजेंद्रसिंह सिसोदिया (रा.आग्रा, उत्तरप्रदेश) यांची नांवे निष्पन्न केली. या आरोपींच्या शोधसाठी एलसीबीब व धुळे शहर पोलीस ठाण्याचे संयुक्तीक पथकाने उत्तरप्रदेश व राजस्थान राज्यात जावून आरोपीतांचा कसुन शोध घेतला. चौघांपैकी पुण्द्रसिंग शिवसिंग तोमर राजपुत याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गुन्हयातील गेलेल्या मालापैकी ७७० ग्रॅम सोन्याचे दागिने व २ किलो ४०० ग्रॅम चांदीचे दागिने हस्तगत केले. त्यांची किंमत एकुण ४९ लाख ३६ हजार ७१५ रूपये इतकी आहे. तसेच गुन्हयात वापरलेली ८ लाखांची कार (क्र.यु. पी. ८३.ए.यु. ९३३०) असा एकूण ५७ लाख ३६ हजार ७१५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. गुन्हयाचे तपासात राहुल सिसोदिया याने कुरीयर बॉय गोविंद सिकरवार यास चहामध्ये गुंगीकारक औषध पाजल्याने तो बसमध्ये गाड झोपल्याचे निष्पन्न झाले. पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, सहा. पोलिस अधिक्षक ऋषीकेश रेडी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, धुळे शहरचे पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांनी तपास अधिकारी सपोनि चंद्रकांत पाटील यांच्यासह पोऊनि प्रकाश पाटील, पोहेकॉ विजय शिरसाठ, योगेश चव्हाण, पोना कुंदन पटाईत, महेश मोरे यांना पर राज्यात पाठवुन कारवाई करून गुन्हयातील गेला माल व आरोपी पुष्पेंद्रसिंग शिवसिंग तोमर राजपुत यांस ताब्यात घेतले. तसेच आरोपी राहुल राजेंद्रसिंह सिसोदिया यास धुळे येवून ताब्यात घेण्यात आले आहे.




### नियोजनबध्द पध्दतीने केला गुन्हा, डिलेव्हरी बॉयला गुंगीचे औषध

आरोपींनी नियोजनबध्द पध्दतीने हा गुन्हा केला. डिलेव्हरी बॉयवर लक्ष ठेवले. बसमध्ये त्याच्या बाजुचेच टिकीट बुक केले. बसमध्ये आल्यानंतर राहुल सिसोदिया याने कुरीयर बॉय गोविंद सिकरवार यास चहामध्ये गुंगीकारक औषध पाजल्याने तो बसमध्ये गाढ झोपला. त्यानंतर आरोपींनी डिलेव्हरी बॉयला जाग आल्यानंतर त्याला दागिने चोरीचे लगेच लक्षात येवू नये म्हणून त्याच्या बॅगेत वजनासाठी नारळ आणि पाण्याच्या दोन बाटल्या ठेवल्या. दरम्यान याच्याआधीही आरोपींनी मालेगाव मध्ये असा चोरीचा प्रयत्न केला. मात्र तो अयशस्वी ठरला होता. डिलेव्हरी बॉयने तेव्हा तक्रार न केल्याने तो प्रकार समोर आला नाही. दरम्यान आरोपी राहुल डिलेव्हरीचेच काम करतो.

## चंद्रशेखर आझाद रावण यांच्यावर गोळीबार


### सहारनपूरमध्ये झाला प्राणघातक हल्ला

**मुंबई । प्रतिनिधी**

भीम आर्मीचे संस्थापक, अध्यक्ष चंद्रशेखर आझाद रावण यांच्यावर गोळीबार करण्यात आला. उत्तर प्रदेशातील सहारनपूरमधील देवबंद परिसरात हा प्राणघातक हल्ला झाला. आझाद जखमी झाले असून त्यांना स्थानिक शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या वृत्तानुसार, काही अज्ञातांनी चंद्रशेखर आझादच्या कारवर गोळीबार केला. आझाद यांच्या कमरेजवळून एक गोळी चाटून गेली असल्याची माहिती आहे. कारचे काचाही फुटल्या आहेत. गोळीबारानंतर चंद्रशेखर आझाद यांना उपचारासाठी तातडीने नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी एसएसपी डॉ. विपिन टाडा सहारनपूर यांनी पोलीस महासंचालक विजय कुमार यांना फोनवरून घटनेची संपूर्ण माहिती दिली.

गोळीबाराच्या या घटनेनंतर भीम आर्मीने संताप व्यक्त केला आहे. आरोपींना तातडीने अटक करावी आणि चंद्रशेखर आझाद रावण यांना सुरक्षा पुरवावी अशी मागणी करण्यात आली आहे.



आरएलडीचे स्थानिक आमदार मदन यांनी सांगितले की, सध्या रावण यांची प्रकृती स्थिर असून कोणाताही धोका नाही. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

चंद्रशेखर आझाद यांनी म्हटले की, गोळीबार झाला तेव्हा माझ्यासोबत काहीजण होती. गोळीबारानंतर स्थानिक पोलिसांकडे मदतीसाठी संपर्क साधला. हल्लेखोरांबाबत आता व्यवस्थित आठवत नाही. मात्र, माझ्या सोबत असणारे कार्यकर्ते त्यांना ओळखू शकतील. गोळीबारानंतर हल्लेखोरांची कार सहारनपूरच्या दिशेने गेली. तर, आमच्या कारने यु-टर्न घेतला. हल्ला झाला तेव्हा माझ्या लहान भावासोबत आम्ही पाचजण कारमध्ये होतो.

या घटनेबाबत बोलताना एसएसपी डॉ. विपिन टाडा यांनी सांगितले की, चंद्रशेखर आझाद यांच्या ताफ्यावर काही अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. हे हल्लेखोर कारमधून आले होते. हल्लेखोरांची एक गोळी आझाद यांच्या कमेरजवळून गेली. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## राज्यात ४० हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

### १ लाख २० हजार रोजगारांची निर्मिती

**मुंबई । प्रतिनिधी**

आपल्याकडे होऊ घातलेले उद्योग शेजारच्या गुजरात तसेच भाजप शासित राज्यात जात असल्याची ओरड होत असताना बुधवारी पार पडलेल्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. हे प्रकल्प पुणे, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नंदूरबार, अहमदनगर, रायगड, नवी मुंबई याभागात होणार असून यामुळे सुमारे १ लाख २० हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

या गुंतवणुकीत पुणे आणि औरंगाबाद येथे देशातील पहिल्या सुमारे १२ हजार ४८२ कोटीच्या इलेक्ट्रिक व्हेईकल आणि बॅटरी निर्मिती प्रकल्पाचा समावेश आहे. नवी मुंबईच्या महापे येथे होणाऱ्या जेम्स ॲण्ड ज्वेलरी पार्क प्रकल्पाला अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीनंतर दिली. पुणे, छत्रपती संभाजीनगर येथे गोगोरो इंडिया प्रा. लि. कंपनीमार्फत इलेक्ट्रीक व्हेईकल आणि बॅटरी निर्मिती तसेच स्वॅपिंग स्टेशन इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी करण्यात येणार आहे.

### चंद्रशेखर आझाद यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शन

**धुळे ।** सहारनपूरमध्ये आझाद समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आझाद रावण यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याने एकच खळबळ उडाली. या हल्ल्याचा धुळ्यात निषेध करण्यासाठी आंबेडकरी विचारधारेच्या सर्व सामाजिक व राजकिय पक्षातील पधाधिकाऱ्यानी व आंबेडकरी अनुयायांनी धुळे शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णकृती पुतळ्याजवळ आज सकाळी ११ वाजता उपस्थित राहावे असे आवाहन आनंद लोंढे यांनी केले आहे.

## राजूरबहूला शिवारात अद्यावत आयटी पार्कची उभारणी करण्यात यावी

### खा. गोडसे यांची उद्योगमंत्री सामंत यांच्याकडे आग्रही मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

एक धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून शहराची ओळख आहे. याबरोबरच शहराची औद्योगिक केंद्र अशी ओळख होण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून खा. हेमंत गोडसे यांचे प्रयत्न सुरू आहेत. शहरात अद्यावत आणि परिपूर्ण आयटी पार्कच्या उभारण्यासाठी काल खा.गोडसे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. नाशिक- मुंबई- पुणे हा विकासाचा राज्यातील सुवर्ण त्रिकोण असून नासिक येथे आयटी पार्क होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी नाशिक तालुक्यातील राजूरबहूला येथील प्रस्तावित एमआयडीसीच्या शंभर एकर जागेवर सर्व सोयी सुविधांसह आयटी पार्क उभारण्याची आग्रही मागणी खा.गोडसे यांनी ना. सामंत यांच्याकडे केली आहे.

शहरात असलेले आयटी पार्क वेगवेगळ्या भागात विखुरलेले आहे. सर्वच विखुरलेले आयटी पार्क एकाच परिसरात, छताखाली असावेत यासाठी शहरातील विविध सामाजिक तसेच शैक्षणिक संस्थांकडून खा.गोडसे यांच्याकडे सततचा पाठपुरावा सुरू होता. शहरापासून अगदी जवळच असलेल्या राजुरबहूला येथील प्रस्तावित एमआयडीसीच्या जागेवर अद्यावत आयटी पार्कची उभारणी केल्यास आयटी क्षेत्रातील युवकांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होऊ शकेल असा सुर तमाम शहरवासियांचा आहे. यातूनच आज खा. गोडसे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली.

येथील शंभर जागेत परिपूर्ण आयटी पार्कची उभारणी केल्यास आयटी क्षेत्रातील हजारो युवकांना रोजगार मिळणार असल्याने या ठिकाणी आयटी पार्क उभारण्यात यावे अशी आग्रही मागणी खा.गोडसे यांनी ना. सामंत यांच्याकडे केली आहे. खा.गोडसे यांची मागणी न्यायिक असल्याने लवकरच त्यांच्या मागणीवर सकारात्मक विचार करण्यात येणार असल्याची ग्वाही ना. सामंत यांनी खा. गोडसे यांना दिली.

## अस्वच्छ धुळ्याला जबाबदार कोण? सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था

धुळे महापालिकेच्या स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षाने आणि कालबाह्य स्वच्छतागृहामुळे शहरात स्वच्छतेचे तीनतेरा वाजले असून, नागरिकांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे. तसेच, मुख्य रस्त्यालगतच्या जीर्ण मुताऱ्यांमुळे शहराचे विद्रूपीकरण होऊ लागले आहे.

शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील आहिल्यादेवी नगर मधील स्वच्छतागृहाच्या मनपाने दुर्लक्ष केल्याने शहरातील अनेक मुताऱ्यांमध्ये व परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाली आहे. पुरुष व स्त्रिया यांच्या शौचालयास दरवाजा नाही तसेच आत मध्ये नळ आहे. मात्र पाण्याची सुविधा नाही. लोक उघड्यावर शौचालयात बसतात मग अशा शौचालयाचा काय उपयोग? असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झालेला आहेत. स्वच्छता विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी सार्वजनिक मुताऱ्यांची स्वच्छता नियमित करीत नाही; तर सुलभ शौचालयाचे व्यवस्थापन नियमितपणे होत नसून, जंतुनाशकाची फवारणी केली जात नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. सामान्य नागरिकांच्या तक्रारींचा पाढा वाचताना ज्यांच्या खांद्यावर स्वच्छतेची जबाबदारी आहे ती पालिकेची यंत्रणा काय करते, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. शहरामध्ये सध्या किती स्वच्छतागृहे आहेत? त्यांचा वापर योग्यप्रकारे होतो आहे काय? आणखी किती स्वच्छतागृहांची व कोठे कोठे आवश्यकता आहे? महिलांसाठी वेगळी स्वच्छतागृहे आहेत काय? स्वच्छतेसाठी किती सफाई कर्मचारी ठेवावे लागतील हे स्वच्छतागृहांच्या वापरावर आणि आठवड्यातून किती वेळा सफाई करावयाची यावर अवलंबून राहील. याशिवाय स्वच्छतागृहांच्या स्वच्छतेवर निरीक्षण ठेवण्यासाठी त्या भागातील साठी नगरसेवक आणि परिसरातील नागरिकांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. असे झाले तरच स्वच्छतागृहांना त्यांचे नाव सार्थ ठरेल. स्थानिक पालिकेची देखभाल नसल्याने अनेक शौचालयात घाणीचे साम्राज्य आणि पाणी नसल्याची समस्या आहे. तर लाइट रात्रीच्यावेळी बंद असते. शहराला एक विकसीत शहर म्हणून ओळखले जाते. मात्र, या शहरातील स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेने नागरिक त्रस्त झाले आहेत.







### पाण्याचे नियोजन नाही

शहरातील प्रभाग १७ मध्ये अवघ्या काही महिन्यांपूर्वी शौचालय बांधकाम करण्यात आले होते. त्या ठिकाणी काही दिवस पाण्याचे व्यवस्थापन ही करण्यात आल यामुळे नागरिकांनी याचा वापर केला. व्यवस्थापन आणि मनपाचे निष्क्रिय व्यवस्थापन करणारा निरीक्षक याच्या हलगर्जीपणामुळे आजच्या परिस्थितीत अनेक शौचालयात दुर्गंधी पसरली असून पाण्याचे नियोजन नाही. त्यामुळे पाण्याच्या टाक्या रिकाम्या अवस्थेत आहेत.

भाग ३



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपुरात दाखल; मध्यरात्रीनंतर होणार महापूजा

**पंढरपूर । प्रतिनिधी**

आषाढीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आता पंढरपुरात दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबत राज्याचे अनेक मंत्रीही दाखल झाले आहेत. मध्यरात्रीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आषाढीची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे.

२९ जूनच्या पहाटे मुख्यमंत्री विठुरायाच्या शासकीय महापूजेसाठी मंदिरात जाणार आहेत. शासकीय पूजेनंतर मंदिर समितीकडून होणार सत्कार स्वीकारून पहाटे साडे चार वाजता विश्रामगृहाकडे निघणार आहेत. २९ जून रोजी सकाळी १० वाजता विश्रामगृह येथे अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती पत्र वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. सकाळी ११ वाजता तीन रस्ता येथे आषाढी एकादशी निमित्त होणाऱ्या अन्नदान कार्यक्रमात उपस्थिती लावणार आहेत. दुपारी ११.३० वाजता तीन रस्ता येथे सुरु असलेल्या महाआरोग्य शिबिरात जाऊन वारकऱ्यांशी संवाद आणि महाशिबीराची पाहणी करणार आहेत. दुपारी १२ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये असलेल्या कृषी प्रदर्शनाला भेट देणार असून तेथून पुन्हा मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने सोलापूरकडे रवाना होतील . रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हेदेखील आषाढी सोहळ्यासाठी पोचणार आहेत.

## राव यांचे शक्तिप्रदर्शन

एकीकडे महाराष्ट्रात शक्तिप्रदर्शन आणि दुसर्या बाजूला पक्षात खिंडार, हा संदेश सकारात्मक नाही. शेतकरी डोळ्यासमोर ठेवून भारत राष्ट्र समिती महाराष्ट्रात पाया मिळवू पहात आहे. दलित घटकालाही प्राधान्य देण्याचे त्यांचे धोरण दिसते.

पाटण्यातील बैठकीनंतर विरोधकांच्या ऐक्याची चर्चा रंगलेली असतानाच तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे देखील लक्ष वेधून घेत आहेत. आषाढी वारीचे औचित्य साधून त्यांनी पंढरपुरात पांडुरंगाचे दर्शन घेतले. संपूर्ण मंत्रिमंडळासह पंढरीत आलेला ताफा केसीआर यांची महत्त्वाकांक्षा अधोरेखित करणारा होता. गेल्या काही कालावधीपासून 'भारत राष्ट्र समिती'च्या विस्तारासाठी त्यांची पावले आक्रमकपणे पडत आहेत. तेलंगण आणि महाराष्ट्र ही शेजारी असलेली राज्ये. महाराष्ट्रात पाय रोवण्याचा केसीआर यांचा प्रयत्न आहे. तेलंगण राष्ट्र समितीचे नामकरण 'भारत राष्ट्र समिती' असे झाले, त्याचवेळी तेलंगणापुरते स्वतःचे नेतृत्व मर्यादित ठेवणे केसीआर यांना मंजूर नाही, हे स्पष्ट झाले होते. नांदेडमधून ते लोकसभा निवडणूक लढविणार, अशी चर्चा आहे. राज्यातील भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या सरकारविरुद्ध महाविकास आघाडी मैदानात उतरली आहे. अशावेळी बीआरएसचे महाराष्ट्रात आगमन होत असल्याने राजकीय गणितांवर परिणाम होऊ शकतो. बीआरएस म्हणजे भाजपचा ब संघ आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. काही काळापूर्वी उद्धव ठाकरे यांना मुंबईत येऊन भेटणारे केसीआर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत, हे नक्की.

तेलंगणाबाहेर विस्तार

आंध्र प्रदेशाचे विभाजन होऊन तेलंगण राज्याची निर्मिती झाली. नवे राज्य अस्तित्वात आल्यावर सलग दुसर्यांदा सत्ता राखण्यात केसीआर यांना यश आले. आता वर्षअखेरीस तेलंगणमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. तेलंगणाबाहेर बीआरएसच्या विस्ताराच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या ठरतील. तेलंगणमध्ये चंद्रशेखर राव यांच्यासाठी सर्व आलबेल आहे, असे नव्हे. हैदराबाद महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने दिलेली धडक राव विसरलेले नाहीत. एक माजी खासदार, बारा माजी मंत्र्यांसह अनेक पदाधिकार्यांनी नुकताच काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांना धक्का दिला. त्यांच्या कार्यपद्धतीवर या सर्वांनी नाराजी व्यक्त करून त्यांची साथ सोडली. एकीकडे महाराष्ट्रात शक्तिप्रदर्शन आणि दुसर्या बाजूला पक्षात खिंडार, हा संदेश सकारात्मक नाही. शेतकरी डोळ्यासमोर ठेवून भारत राष्ट्र समिती महाराष्ट्रात पाया मिळवू पाहात आहे. दलित घटकालाही प्राधान्य देण्याचे त्यांचे धोरण दिसते. शेतकरी वर्ग एकाच पक्षाच्या अथवा संघटनेच्या मागे उभा राहिला, असे महाराष्ट्रातील चित्र कधीही नव्हते. राज्यात शहरी आणि निमशहरी भाग मोठा आहे. सुमारे साठ टक्के मतदार या भागात राहतात, हेही लक्षात घ्यावे लागेल. या मोठ्या संख्येने असलेल्या मतदारांना आकर्षित करण्यासाठी राव काय करणार? हा खरा प्रश्न. तेलगु भाषक अधिक संख्येने असलेल्या महाराष्ट्रातील सीमा भागावर राव यांनी लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. त्यांच्या पंढरपूर भेटीच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील पूर्व भागात मोठ्या संख्येने पक्षाचे ध्वज फडकावून वातावरण निर्मिती करण्यात आली. तेलंगणबाहेर विस्तार, हे धोरण असले तरी त्यांचे सर्वोच्च प्राधान्य अर्थातच तेलंगणचा गड राखण्याचे आहे. विविध समाजघटकांना जोडून घेण्यात त्यांनी यश मिळविले हे मान्य करावे लागेल. शेतकर्यांसाठी 'रयत बंधू' योजना, किमान आधारभूत किमतीवर चालणारी सात हजार तांदूळ खरेदी केंद्रे, कालेश्वरम प्रकल्प अशा राव यांनी आणलेल्या योजना यशस्वी ठरल्या. कर्नाटक हातून गेल्याने भाजपसाठी दक्षिणेतील इतर सर्वच राज्य महत्त्वाची आहेत. भाजपचे वरिष्ठ नेते सातत्याने तेलंगणमध्ये कार्यक्रम घेत आहेत. काँग्रेसने निवडणुकीच्या दृष्टीने २६ लाखांहून अधिक कार्यकर्त्यांच्या नोंदणीचे लक्ष्य ठेवले आहे. राव यांना अस्थिर करण्याचे प्रयत्न भाजपने केले, मात्र ते फसले. दिल्लीतील मद्यविक्री गैरव्यवहारात राव यांच्या मुलाचा संबंध जोडण्यात आला. ईडीने छापे टाकले. आज जरी राव भाजप आणि काँग्रेसला जोरदार विरोध करीत असले, तरी त्यांचा भाजपविरोध कायम राहील का? हा प्रश्न आहे! विरोधकांच्या ऐक्याचे नगारे वाजू लागले असले तरी राव यांच्या भूमिकेमुळे तिसर्या आघाडीची शक्यता कायम राहते!

# विद्यार्थ्यांच्या हितासाठीच ढकलगाडी बंद...

आयुष्यात परीक्षांना अनन्यसाधारण महत्त्व असून पदोपदी द्याव्या लागणाऱ्या परीक्षा जर आपण चांगल्या प्रकारे पास झालो, तर आपसुकच आपले मनोबल वाढते, आत्मविश्वास द्विगुणीत होतो आणि कोणत्याही परीक्षांना अगदी संकटांनाही धीरोदात्तपणे सोमारे जाण्यास आपण सदैव सज्ज असतो. त्यामुळेच आयुष्याच्या प्रारंभी म्हणजेच शालेय जीवनात द्याव्या लागणाऱ्या विविध परीक्षांना मोलाचे स्थान आहे. जर या परीक्षाच नसतील, तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा कस लागणार नाही. गुरुजनांच्या माध्यमातून आपल्याला प्राप्त झालेले नानाविध विषयांचे ज्ञान आपण किती प्रमाणात आत्मसात करू शकलो याचे मूल्यमापन परीक्षांमुळेच शक्य होते. पण काही तज्ज्ञांच्या मते शालेय जीवनात परीक्षांना अतिमहत्त्व दिले जात असल्याचे कारण पुढे करून आणि त्यास अनुसरून काही वर्षांपूर्वी तसे शैक्षणिक धोरण आखले गेले. त्यामुळे पहिली ते आठवीपर्यंत परीक्षा घेतल्या जात नव्हत्या व सर्व मुलांना श्रेणी (ग्रेड) नुसार पुढच्या वर्गात पाठविले जात असे. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वर्षांचे नुकसान होत नव्हते. म्हणजेच मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे.त्यासाठीच शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता



जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे.

आता नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांची इयत्ता पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी पाचवी आणि आठवी वर्गाची वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्याला बंधनकारक करण्यात आले आहे. शालेय शिक्षणात पहिली ते आठवी इयत्तांच्या परीक्षा घेतल्या तरी सगळ्याच विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात बढती देण्याच्या धोरणात बदल करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. विद्यार्थ्यांना सरसकट ८ वीपर्यंत उत्तीर्ण करण्याचा निर्णय बदलण्यात आला आहे. पाचवी आणि आठावी इयत्तेत आता वार्षिक परीक्षा घेण्यात येणार आहे. तसेच इयत्ता पाचवी आणि आठवीच्या या वार्षिक परीक्षांमध्ये जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास पुनर्परीक्षेचा एक चांगला पर्याय विद्यार्थ्यापुढे असणार आहे. मात्र या पुनर्परीक्षेतही जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास इयत्ता पाचवी आणि आठवीच्या त्या वर्गातच संबंधित विद्यार्थ्याला ठेवले जाणार आहे. पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना वयानुरूप वर्गात प्रवेश दिला जाईल. सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना पाचवीच्या वर्गासाठी निश्चित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. जर विद्यार्थी पाचवीची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्याला पाचवीच्याच वर्गात प्रवेश दिला जाईल. आतापर्यंत, या प्रकारच्या आव्हानाला विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत नव्हते. विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर त्याला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करण्यात येईल. वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांत त्याची पुनर्परीक्षा घेण्यात येईल. विद्यार्थी पुनर्परीक्षेच्या गुणपत्रिकेत लाल शेरा आल्यास किंवा तो अनुत्तीर्ण झाल्यास त्याला पुन्हा पाचवी किंवा आठवीच्याच वर्गात ठेवले जाईल. हे करताना प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून मात्र काढून टाकले जाणार नाही, याची कटाक्षाने काळजी घेण्यात आली आहे.

शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत उत्तीर्ण करणे बंधनकारक होते. पण असे केले गेल्यामुळे विद्यार्थी हा बहुतांश विषयात कच्चा राहू लागला, असल्याची बाब उघड झाली. परिणामी विद्यार्थ्यांची गुणवत्ता थेट नववी इयत्तेत दिसत असल्याने वार्षित परीक्षेत अनेक विद्यार्थी अपयशी ठरत होते. पण आता नव्या शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळेच शालेय शिक्षणावेळीच विद्यार्थ्यांची दोन टप्प्यात गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठीच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये आता राज्य सरकारने सुधारणा केली आहे. त्यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयावर मतमतांतरे व्यक्त केली जात आहेत. परीक्षा पद्धत बदलत नाही, तोपर्यंत विद्यार्थ्यांना गुणांच्या आधारावर उत्तीर्ण-अनुत्तीर्ण करण्याला कोणताही अर्थ नाही. मुलांची चौकस बुद्धी, सर्जनशीलता, शिकलेल्या गोष्टींची दैनंदिन अनुभवांना सांगड घालणे या गोष्टी तपासल्या जात नाहीत तोपर्यंत खरे मूल्यमापन होणार नाही. सध्याच्या परीक्षा पद्धतीत केवळ माहिती विचारली जाते आणि मुले उत्तरे पाठ करून ती लिहितात. त्यापलीकडे काही नसते. सध्या परीक्षा घ्यायला हरकत नाही; पण त्या परीक्षेच्या आधारावर पाचवीत अनुत्तीर्ण केल्याने काहीही निष्पन्न होणार नाही. सध्याच्या पद्धतीने परीक्षा घेण्याच्या मार्गात ही गुणात्मक बदल करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता; परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू करण्याचा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासही मदत होईल. तसेच पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे आठत्तीपर्यंतची ढकलगाडी बंद झाल्यास त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की, नाही याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय हा योग्यच म्हणावा लागेल.

# प्लास्टिक,मायक्रो प्लास्टिक किती घातक?

नुकताच ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा झाला. वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण अशा अनेक प्रकारांनी प्रदूषित होणारे पर्यावरण आणि साहजिक त्याचा सजीव सृष्टीवर होणारा दुष्परिणाम यावर खूप लिहिले जाते, बोलले जाते. कृती करण्यावर भर देण्यात येतो आणि जनजागृती केली जाते. या सर्व घटकांबरोबरच वातावरणावर प्लास्टिकचा होणारा गंभीर परिणाम ही सुद्धा एक चिंतित करणारी समस्या बनली आहे. नुकतेच वर्तमानपत्रातील बातमीवरून समजले की, प्लास्टिकच्या बाटल्यांचा कचरा १२ लाख किलोंनी वाढला आहे. सन २०२१ मध्ये ४६ लाख ९८ हजार १६४ किलो प्लास्टिक बाटल्या सापडल्या, तर सन २०२२ मध्ये ५८ लाख ९८ हजार ११४ किलो प्लास्टिक बाटल्या सापडल्या.

त्यापुढे जाऊन आणखी एक चिंतित करणारी बातमी वर्तमानपत्रातून वाचनात आली ती म्हणजे मायक्रोप्लास्टिकचा शरीरावर होणारे गंभीर परिणाम.

मंडळी, प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक बाटल्या, प्लास्टिक वेष्टने या स्थूल गोष्टी व त्यांच्या वापराबद्दल अधिक कठोर मार्गदर्शक तत्त्वे तयार करून त्याची कठोर अंमलबजावणी करण्यावर भर देऊन प्लास्टिक वापर कमी करता येईल. पण दात घासण्यासाठीचा ब्रश, पाण्याची बाटली वापरात असताना त्यातील पाण्याबरोबर जाणारे मायक्रोप्लास्टिक, प्लास्टिक कंटेनरमध्ये ठेवलेल्या अन्नपदार्थातून शरीरात जाणारे मायक्रोप्लास्टिक हे थेट आपल्या मेंदूपर्यंत पोहोचत असते आणि मेंदूवर त्याचा दुष्परिणाम करीत असते. हे खूपच गंभीर



आहे.

काय आहे हे मायक्रो प्लास्टिक?

युरोपीय केमिकल एजन्सीनुसार मायक्रोप्लास्टिक हे पाच मिलिमीटरपेक्षा कमी लांबीचे कोणत्याही प्रकारचे प्लास्टिकचे कण. यामध्ये कपड्यांचे मायक्रोफायबर, मायक्रोबीड्स, प्लास्टिक पेलेट्स यांचा समावेश आहे. तसेच टायर्स, सिन्थेटिक टेक्स्टाइल्स, मरीन कोटिंग्स, रोड मार्किंग्स, काही पर्सनल केअर प्रॉडक्ट्स वगैरे सुद्धा मायक्रो प्लास्टिक म्हणून ओळखले जाते. तसेच सिटी डस्टमध्ये सुद्धा मायक्रोप्लास्टिक आढळते. त्याशिवाय मायक्रो प्लास्टिक हे बिअर, वाईनमध्ये पॉलिथिलीन स्टॉपर्स म्हणून असते तर तांदूळ, टेबल सॉल्ट मध इ. मध्येही हे आढळते तर सफरचंद, गाजर, ब्रॉकली इ. भाज्या/फळे त्यांच्या मुळांवाटे नॅनोप्लास्टिक शोषून घेतात.

या मायक्रो प्लास्टिकमुळे शरीराचे अनेक प्रकारे नुकसान होते. ते कण लाल पेशींच्या बाहेरील भागाला चिकटतात त्यामुळे ते प्राणवायूचा प्रवास रोखू शकतात. याचा परिणाम म्हणून उतींमध्ये प्राणवायूचा पुरवठा कमी होऊ शकतो. मायक्रो प्लास्टिक शरीराच्या सर्वच संस्थांवर (पचनसंस्था, मज्जासंस्था इ.) घातक परिणाम करते असेही संशोधनाअंती आढळून आले आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार आपण एक लाखाहून अधिक मायक्रोप्लास्टिकचे कण कधी कधी शरीरात रिचवतो. 'टेक्साईल' हे सर्वात जास्त एअरबॉर्न मायक्रोप्लास्टिकचा स्त्रोत आहे असे शास्त्रज्ञ सांगतात. मायक्रोप्लास्टिक खाण्यामधून शरीरात गेले तर ते पेशींचे नुकसान करतेच पण शरीरात 'गॅस्ट्रो एन्टेरिटिस' हा पोटाचा विकार जडू शकतो त्याबरोबरच रोगप्रतिकारक शक्तीवरही परिणाम होतो. श्वसनाचा विकार जडू शकतो तर वंधत्वाची परिणिती ही यांच्या अतिसेवनाने येऊ शकते. कॅन्सर सारखा गंभीर आजारही होऊ शकतो इतकेच नाही तर शरीराच्या गुणसूत्रावरही परिणाम होतो. तेव्हा मंडळी, हे मायक्रो प्लास्टिक संथगतीने शरीरावर दुष्परिणाम घडवून आणते. काही वेळा तर शरीराचे नको इतके वजन वाढते आणि त्यामुळेही इतर आजारांना आमंत्रण मिळते. इतकेच नाही, तर गर्भातील मेंदूच्या वाढीवर परिणाम करते, तर लहान मुलांच्या मेंदूच्या वाढीवर परिणाम करते. इतके हे मायक्रो प्लास्टिक घातक आहे.

प्लास्टिकपासून पूर्णपणे दूर राहणे कठीण आहे हे खरे जरी असले तरी अशक्य नाही. आपल्या रोजच्या जीवनातला त्याचा वापर कमीत कमी कसा करता येईल याचा विचार, प्रयत्न आणि मग त्याची अंमलबजावणी ही प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. या मायक्रोप्लास्टिकचा शरीरात कमीत कमी शिरकाव होईल, याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी.

मायक्रोप्लास्टिकला टाळण्यासाठी कोणत्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे तर

१. प्रक्रिया केलेले अन्न खाणे शक्यतो टाळावे किंवा कमीत कमी खाल्ले जाईल याची खबरदारी घ्यावी.

२. शक्य तो प्लास्टिक बाटलीत पाणी साठवून पिऊ नये फिल्टर केलेले नळाचे पाणी प्यावे.

३. इको फ्रेंडली बाटल्यांचा जसा की काचेच्या बाटल्या किंवा स्टेनलेस स्टीलच्या बाटल्या यांचा वापर करावा. घरी काचेचा ग्लास किंवा स्टीलचा ग्लास वापरावा.

४. काही अन्नपदार्थांसाठी किंवा खाण्याच्या वस्तूंसाठी इको फ्रेंडली पॅकेजिंग वापरावे.

५. फ्रीजमध्ये प्लास्टिक बाटल्यांमध्ये पाणी ठेवणे टाळावे. काचेच्या बाटल्यांचा वापर करावा.


६. मायक्रो वेव्हमध्ये अन्न पदार्थ गरम करताना प्लास्टिक कंटेनरचा वापर करू नये.

७. ज्यावेळी आपण हॉटेलमधून काही अन्नपदार्थ जर घरी घेऊन जाणार असू, तर इको फ्रेंडली रिफिलेबल (ठशषळश्रश्ररलश्रश) कंटेनरचा वापर करावा.

प्लास्टिकच्या विघटनाला हजारो वर्षे लागतात. हे मायक्रो प्लास्टिक वातावरणावर गंभीर परिणाम करतात. ते विघटनशील नाहीत. वातावरण विषारी (ींळल) करून टाकतात. समुद्रामधील प्लास्टिक/मायक्रो प्लास्टिक सागरी जीवनही दूषित करतात. याबाबत जनमानसात फारशी जागृती असलेली दिसत नाही. हे सर्व टाळण्यासाठी वरती उल्लेखिलेल्या उपायांचा अवलंब प्रत्येक जागरूक ग्राहकाने करायला हवा जेणेकरून आपल्या पुढील पिढ्यांना तरी काही प्रमाणात आरोग्यपूर्ण वातावरण/पर्यावरणाचा लाभ घेता येऊ शकेल व प्रकृतिस्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होईल.

**-ज्योती मोडक : मुंबई ग्राहक पंचायत**

## शब्दकोडे-१०६



आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती ६. ऐनवेळी कच खाणारा ११. न्याय १२. सोशिकपणा १४. नवरा १५. अरण्य १६. लोटी १८. उगवत्या सूर्याचा देश २१. च्या पुढे, समक्ष २३. वेळेचा कमीत कमी भाग २४. विरोध, प्रतिबंध २७. पत, प्रतिष्ठा २८. शंकराजवळचे चर्मवाद्य २९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास ३२. अवधान, लक्ष ३३. भडक ३६. पळून जाणे ३९. कलावंत ४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद ४४. सोसाट्याचा वारा ४५. पवित्र ४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना ४९. परिस्थिती, कालाचे परिमाण ५२. सामान ५३. बस्तान ५४. मज्जाव ५६. आश्रय, थारा ५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य ६०. वाहणारी हवा ६१. जन्मदाते ६३. पाणी ६५. दक्ष ६६. यजमान ६७. आरोप, बालंट ६८. प्रयाण ६९. लोकमानस ७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी) ७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र ७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी) ७६. कामाचा उरका ७८. शिव ८०. अवाजवी ८२. भाजपा नेते 'नितीन ----' ८४. संथ ८५. स्तुतीची गाणी ८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

उभे शब्द

१. लकब २. खिशाला चाट ३. धास्ती, भीती ४. आपले राष्ट्रगीत ५. आलटापालट ७. खून ८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी ९. डोसा १०. शरीर, काया १३. गलबताचे कापड १७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी १९. वैमानिक (इंग्रजी) २०. अंकुर २२. रम्य, मनोहर २५. दात २६. अंधार २७. फोडणीचे वरण ३०. प्रचंड ३१. जपजाप्य ३४. बगळा ३५. थेळ, सरळ ३७. लोकरीचा एक प्रकार ३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण ४०. लबाडीचा हेतू ४२. सर्वस्वाने ४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा ४५. पालनपोषण करणारा ४७. शोभणारा ४८. मृत्यूदेवता ५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट ५१. नूतन ५२. तंबाखूचा असल्यास घातक ५५. मानबिंदू (ला.) ५७. कमळ ५८. दिवस ५९. कणीदार ६०. संसारातून अंग काढून घेणे ६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य ६२. दाह, मत्सर ६४. मिरवणूक ६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना ६६. नम्रतेने मान खाली घालणे ६७अ. आल्या पावली, लगेच ७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती) ७२. थकवा ७४. सांभाळ ७७. खाली खेचणे, पराभूत करणे ७८. अधिकाराचे स्थान ७९. त्रासलेला ८०. शर्त ८२. माराची उठलेली खूण ८३. अस्वल

### शब्दकोडे १०५ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.जंगल ३.आवाहन ६.दमा ८.पराजय ११.तानसेन १२.शाळामास्तर १४.मन १५.तुरट १९.दरवाजा २१.नीज २२.गत २४.रसा २६.नारद २८.मालामाल २९.गजानन ३१अ.दुआ ३३.पळस ३४.टवाळ ३५.मलमास ३७.पान ३८.घन ३९.रडारड ४०.आरसा ४२.साल ४३.मम ४४.गुण ४५.ताप ४६.यमल ४८.माजघर ५०.कयास ५२.कपट ५३.तसदी ५५.मायावती ५७.चरा ५८.धंदा ५९.नटखट ६०.मज्जाव ६१.आभार ६३.रसद ६५.समाधान ६७.वजन ६९.लयास जाणे ७१.मालक ७३.नीरद ७५.कासार ७७.मस ७९.छू ८०.ओळखणे ८१.गवत ८२.टणक ८३.पाताळ ८४.वाद

**उभे उत्तर**

१.जंगली २.लता ३.आ सेतु हिमाचल ४.वानर ५.नशा ६.दमादमान ७.मास्तर ९.राम १०.जननी १३.रवाना १६.नग १८.टर २०.जारणमारण २३.तमासगीर २५.सागवान २७.संपत्ती ३०.जाळ ३१.नमन ३२.आखाडसासरा ३४.टपाल ३६.सडा ३८.घमघमाट ४०.आपपरभाव ४१.साय ४२.सालस ४३.मज ४५.ताक ४७.मतदार ४९.रया ५१.याचना ५४.दीनदयाळ ५६.वर्तमानकाळ ६०.मन मारणे ६२.रजनीकांत ६४.सल ६६.अकलमंद ६८.नर ७०.जास्त ७२.तवंग ७४.दमट ७६.साखर ७८.सण ८०.ओळ

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# कालिका पार्कमध्ये साचलेल्या पाण्यात शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनची निदर्शने



## रहिवाशांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**

रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचल्याने जगतापनगर, कालिका पार्क भागात काल बुधवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, सत्कार्य फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांसह रहिवाशांनी पाण्यात उभे राहून निदर्शने केली. घोषणाबाजी करीत पावसाळी गटार टाकून कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची मागणी केली. दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. महापालिका अधिकार्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

प्रभाग क्रमांक २४ मध्ये पहिल्याच पावसात गोविंदनगर, कालिका पार्क, जगतापनगर भागात ठिकठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने तळे निर्माण झाले होते. कालिका पार्क-जगतापनगर रस्त्यावर मंगळवारपासून मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना घरांमध्ये जाणे-येणे अवघड झाले होते. सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी बुधवारी सकाळी साचलेल्या पाण्यात उभे राहून निदर्शने केली. या पाण्याचा निचरा करा, पावसाळी गटारीला जोडणारी लाईन टाका, अशी मागणी करीत घोषणाबाजी केली. या आंदोलनात शिवसेना शाखाप्रमुख बाळासाहेब मिंधे, डॉ. जयंतीभाई पटेल, संगीता देशमुख, धवल खैरनार, रेखा देशमुख, संगीता भावसार, घनश्याम पटेल, कैलास देशमुख, उमेश भावसार, गौरव रत्नाकर, जयश्री पटेल, कणकलता जोशी, पुनम पाटील, प्रिया खैरनार, शिल्पा वाणी, स्मरणिका चंद्रात्रे, अलका कासोदेकर आदींसह रहिवाशी सहभागी झाले होते. एक तासाच्या आंदोलनानंतर महापालिका बांधकाम विभागाचे शाखा अभियंता जगदीश रत्नपारखी, सहाय्यक कनिष्ठ अभियंता हिरामण दातीर, विनीत बिडवाई आदींसह कर्मचारी या ठिकाणी आले. तातडीची उपाययोजना म्हणून मल:निस्सारणच्या चेंबरमध्ये पावसाचे पाणी सोडण्यात आले. बुजलेले पावसाळी चेंबर मोकळे करण्यात आले. पाणी साचणार्या ठिकाणी कॅचपीट टाकून ते पावसाळी गटारीला जोडण्याची उपाययोजना करण्यात येईल, असे आश्वासन शाखा अभियंता रत्नपारखी यांनी दिले. दरम्यान, संपूर्ण प्रभागात उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनने दिला आहे.



# ब्राम्हण महासंघ मैत्रेयी ग्रुपच्या वतीने कांदा नवमी साजरी

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव येथील ब्राह्मण महासंघ मैत्रेयी महिला मंडळाच्या वतीने कांदे नवमी साजरी करण्यात आली

आषाढी शुध्द एकादशीपासून ते कार्तिकी शुध्द एकादशीपर्यंत चातुर्मास असतो.चातुर्मास म्हणजे वर्षातले चार महिने,कांदा लसुण खाणं बंद करायचं.मग ते बंद करण्यापूर्वी कांद्यापासून तयार केलेले पदार्थ भरपूर खाऊन घ्यायचे म्हणून मोठी एकादशीपूर्वी अर्थात आषाढ शुद्ध नवमीला कांदे नवमी म्हणून साजरी केली जाते. या प्रसंगी काळ्या मातीचे सिड बॉल तयार करून त्यामध्ये शेण,गांडूळ खत मिक्स करून त्यात वेगवेगळ्या फळांच्या बिया टाकण्यात आल्या. प्रवासाला जाताना हे सिड बॉल कुठे टाकले तर तिथे झाड उगवेल व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मदत होईल. या उपक्रमात ब्राह्मण महासंघाच्या विश्वस्त तथा मैत्रेयी ग्रुप च्या अध्यक्ष स्मिता कुलकर्णी,स्वाती जोशी,रजनी कुलकर्णी,कल्याणी कुलकर्णी,प्राजक्ता भंडारी,अनिता जोशी,सविता जोशी,उज्वला दीक्षित,सपना पारीक,जया राहतेकर,अर्चना दीक्षित,सुरेखा जोशी,क्षिती जोशी उपस्थित होत्या.प्राजक्ता भंडारी यांनी सिड बॉल मांडण्यासाठी उत्कृष्ट सजावट केली.

---

**अॅड.**
**निशाणी नं.१०**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

स्पे.द.नं. ८५/२०२३

राजेंद्र रामराव पाटील ........**धनको**

**विरुध्द**

चंद्रकांत तोताराम पाटील
रा. प्लॉट नं. १०/ब, सार्थक कॉलनी,
बोरसे नगर, वलवाडी रोड, देवपूर धुळे ........**ऋणको**

यातील ऋणको चंद्रकांत तोताराम पाटील यांना या जाहिर नोटीसीन्वये कळविण्यात येते की, धनको यांनी दाखल केलेली दरखास्त स्पे.द.नं. ८५/२०२३ चे कामी आपणास सातत्याने नोटीस वर नमूद पत्त्यावर काढण्यात आल्यात. मात्र आजतागायत सदरच्या नोटीसीची बजावणी झालेली नाही. त्यामुळे मे. कोर्टाने ऋणको विरूध्द जाहिर नोटीसीने नोटीस बजावणीबाबत आदेश केलेला आहे.

तरी या जाहिर नोटीसीन्वये कळविण्यात येते की, धुळे येथील मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर धुळे यांचे कोर्टात आपण दिनांक २७/०७/२०२३ रोजी १०:३० वाजता स्वतः अथवा आपण अधिकार दिलेल्या इसमास अथवा विधीतज्ञास, वकीलास वकीलपत्र देवुन उपस्थित ठेवावे. आपल्या मार्फत सदर कामी कोणीही उपस्थित न झाल्यास सदर प्रकरणी आपले काहीएक म्हणणे नाही असे समजुन मे. कोर्ट पुढील आदेश पारीत करेल, याची नोंद घ्यावी. कळावे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे.

धुळे
दिनांक : २७/०६/२०२३

आदेशावरुन

**अधिक्षक** (शिक्का) **कामगिरी कारकुन**
**म. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर धुळे** — **म. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर धुळे**

---

**अॅड. एम. बी. जैन, धुळे**
**निशाणी नं.२१०**

## जाहीर नोटीस/समन्स

**धुळे येथील मे. २रे सह दिवाणी न्यायाधिश साहेब वरीष्ठ स्थर यांचे कोर्टातत**

रे.मु. नं. २७५/२०१२

रमेश कौतिक सोनवणे ......**वादी**

**विरुध्द**

२. सुधीर देवचंद बाविस्कर (मयत) वै. ........**प्रतिवादी**

प्रति २(अ) श्रीमती. वत्सलाबाई देवचंद बाविस्कर २ (ब) श्री. गणेश सुधिर बाविस्कर २(क) श्री. पंकज सुधिर बाविस्कर २ (ड) श्री. रमेश बाप सुधिर बाविस्कर २ (इ) श्रीमती सुरेखाबाई सुधिर बाविस्कर सर्व रा. शिरूड ता. जि. धुळे श्रीकृष्णकमल सोसायटी, चक्करबर्डी रोड, गोळीबार टेकडी, रामकृष्ण मंदिराजवळ, धुळे.

ज्याअर्थी वादीने दाखल केलेला उपरोक्त दावा वर नमुद न्यायालयात न्यायप्रविष्ठ असुन सदर दाव्यातील मयत प्रतिवादी नं. २ सुधिर देवचंद बाविस्कर यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत दिलेल्या अर्जाच्या अनुशंगाने मयताचे वारस म्हणुन वर नमुद केलेले प्रस्तावित प्रतिवादी नं. २ (अ) ते २(इ) म्हणुन आपण असल्याने आपणास मे. कोर्टा मार्फेत तसेच रजिस्टर पोस्टाने नोटीसा / समन्स पाठविण्यात आले असता आपणावर प्रभाविपणे बजावणी होत नसल्याचे दिसते.

त्याआर्थी वर नमुद दाव्याची पुढील सुनवणी तारीख ०७/०७/२०२३ असुन सदर तारखेस सकाळी १०:३० वाजता आपण स्वताः जातीने किंवा यथायोग्य सुचना दिलेल्या असुन जो दाव्या संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल किंवा अश्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकनारी व्यक्ती ज्याच्या बरोबर असेल अश्या माहितगार वकींला मार्फेत दाव्याचे कामी हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलविण्यात येत आहे आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा व तुमच्या कबज्यात किंवा अखत्यारीत असलेले दस्तऐवज हजर करण्याचा निर्देश तुम्हाला या द्वारे देण्यात येत आहे. वर नमुद दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत वर नमुद दाव्याचे कामकाज व सुनवणी होवुन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस/समन्स माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिले असे.

आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे** — **दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे**

---

**प्रोसेस जमा** **अॅड. श्री.अनिल बी. गायकवाड, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.सह.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १७८/२०२३**

श्रीमती.लक्ष्मीबाई तुकाराम थैल (कोकणी) व इतर - ३
उ. व . - ७६ धंदा - काहीनाही,
राहणार-जामखेल ता.साक्री, जि.धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ........**सामनेवाला**

मयत-कै.तुकाराम देवल्या कोकणी (थैल)-(मृत्यू दिनांक - ०९/११/२०१९)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक २१/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. तुकाराम देवल्या कोकणी (थैल) यांचे दिनांक ०९/११/२०१९ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. लक्ष्मीबाई तुकाराम थैल (कोकणी),
२. श्री. पांडुरंग तुकाराम थैल (कोकणी),
३. सौ. अनिता सुभाष चौरे,
४. सौ. सरला राजु पवार,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०५/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि.२७/०६/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साकी
दिनांक २७/०६/२०२३

आदेशावरुन

**क. लिपीक** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** — **सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेस जमा** **अॅड. श्री.अनिल बी. गायकवाड, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.सह.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १५०/२०२३**

श्रीमती. झिंगुबाई चंदु चौधरी व इतर - ५ उ.व.-५९, धंदा-घरकाम
राहणार-मापलगांव, ता.साक्री, जि.धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ........**सामनेवाला**

मयत - कै. चंदु बारकु चौधरी - (मृत्यू दिनांक - १६/०४/२०२१)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ०८/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. चंदु बारकु चौधरी यांचे दिनांक १६/०४/२०२१ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. झिंगुबाई चंदु चौधरी,
२. श्री. शाहीराम चंदु चौधरी,
३. श्री. हरीदास चंदु चौधरी,
४. श्री. मोतिराम चंदु चौधरी,
५. सोनी चंदु चौधरी,
६. श्री. छोटीराम चंदु चौधरी,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १९/०७/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि.२७/०६/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ -साक्री
दिनांक-२७/०६/२०२३

आदेशावरुन

**क. लिपीक** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** — **सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेस जमा** **अॅड. श्री.अनिल बी. गायकवाड, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.सह.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १८६/२०२३**

श्रीमती. शोभाबाई भ्र. अशोक सोनवणे व इतर - १
उ. व . - ३६, धंदा - घरकाम,
राहणार-पानखेडा, ता.साक्री, जि.धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ........**सामनेवाला**

मयत - कै. अनुसयाबाई रमेश मालुसरे -
( मृत्यू दिनांक - १५/०८/२००४)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक २७/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. अनुसयाबाई रमेश मालुसरे यांचे दिनांक १५/०८/२००४ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. शोभाबाई भ्र. अशोक सोनवणे,
२. श्रीमती. लताबाई दशरथ सोनवणे,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १४/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि.२७/०६/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साकी
दिनांक २७/०६/२०२३

आदेशावरुन

**क. लिपीक** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** — **सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेस जमा** **अॅड.श्रीमती.वनिता ए. खैरनार**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क्र.२०/ २०२३**

श्रीमती. द्वारकाबाई दत्तात्रय देसले, उ. व. ७७, धंदा - घरकाम,
रा. देगांव, ता. साक्री, जि. धुळे वैगरे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ........**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट (VII) १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी वरील न्यायालयात दिनांक १०/०१/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की, सतिष दत्तात्रय देसले यांचे दिनांक ०४/१२/२०२२ रोजी निधन झाले आहे. मयतांचे मृत्यूसमयी त्यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत-

१. श्रीमती. द्वारकाबाई दत्तात्रय देसले-आई
२. ग.भा. स्वाती सतिष देसले-पत्नी
३. चि. उदय सतिष देसले -मुलगा
४. धनश्री सतिष देसले-मुलगी

मयतास वरील प्रमाणे वारस असुन त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. मयत सतिष दत्तात्रय देसले यांचे कायदेशीर वारस असलेबाबत घोषित होवुन मिळणेकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी मा. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, साक्री यांचे न्यायालयात दिनांक १७/०७/२०२३ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- २७/०६/२०२३

आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, साक्री** — **दिवाणी न्यायालय , साक्री**

---

**अॅड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो क.स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ७४६/२०२३**

१) प्रविण बाळु चव्हाण उ.वय.:-२३ वर्ष, कामधंदा
रा. साईकिशन हॉटेल मागे नगाव ता जि धुळे
२) उर्मीला राजेश पिंपळे उ. वय.:- २५, वर्ष,कामधंदा-घरकाम
रा.परळी वैजनाथ ता.परळी जि.बीड
३) योगीता महेश महाले उ.वय.:-२२, वर्ष, कामधंदा-घरकाम
एकता नगर बिलाडी रोड ता जि धुळे
४) बाळु मगन चव्हाण उ.व-५५, कामधंदा-मजुरी
रा.साईकिशन हॉटेल मागे नगाव ता.जि.धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

कै. प्रमिलाबाई बाळु चव्हाण (मयत)
मृत्यु दिनांक २३/१२/२०२०
मुत्यु ठिकाण राजनगर देवपुर ता.जि.धुळे ........**सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो . क. स्तर यांचे न्यायालयात दि.२३/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ७४६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. प्रमिलाबाई बाळु चव्हाण (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणर आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ४ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २७/०७/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो . क. स्तर कोर्ट नं. ६, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २७/०६/२०२३

आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** — **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

---

**अॅड. एम. व्ही. घरटे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे. २ रे सह दिवाणी न्यायाधिश सो., (क.स्त.) यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं. ६९३/२०२३**

१. श्री. मगन चिंधा पाटील उ.व.-६५, धंदा -शेती,
रा. सुभाष चौक, लामकानी, ता. जि. धुळे. ........**अर्जदार**

**विरुध्द**

१. कै.मालनबाई उर्फ माणकाबाई रामचंद्र पाटील
मयताचा पत्ता -लामकानी, ता. जि. धुळे.
मृत्यु दिनांक : १२/०१/१९८१
२. कै.रामचंद्र धाकु पाटील मृत्यु दिनांक : २०/०५/१९७५
मयताचा पत्ता-लामकानी, ता.जि.धुळे.
३. कै.चिंधा रामचंद्र पाटील मृत्यु दिनांक : २७/०३/२०००
मयताचा पत्ता-लामकानी, ता.जि.धुळे.
४. कै.धनाबाई चिंधा पाटील मृत्यु दिनांक : १०/१०/१९९४
मयताचा पत्ता-लामकानी, ता.जि.धुळे.
५. कै.लटकनबाई तुकाराम शेलार मृत्यु दिनांक : १६.०४.२०२१
मयताचा पत्ता-लामकानी, ता.जि.धुळे.
६. कै.तुकाराम विष्णु शेलार मृत्यु दिनांक : ०३/०७/२०२०
मयताचा पत्ता-मु.पो.घाणेगांव,ता.साक्री, जि.धुळे.

........**सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

अर्जदार यांनी ते मयत कै. मालनबाई उर्फ माणकाबाई रामचंद्र पाटील यांचे कायदेशीर वारस आहे असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक :३१/०७/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.२७/०६/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक :- २७/०६/२०२३

आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** — **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

## न्यूज कॉलम

### रेल्वेला धडकून जागीच तरुणाचा मृत्यू

धुळे । शहरातील बंद रेल्वेगेटच्या पुढे चाळीसगावकडून धुळ्याकडे येणाऱ्या रेल्वेला धडकल्याने तरुण जागीच ठार झाला. २६ जूनला दुपारी तीनच्या सुमारास हा अपघात झाला. प्रदीप अरुण महाले (वय ३४, रा. तिरूपती प्रोव्हीजनसमोर, वर्षावाडी, मोहाडी,धुळे) असे मृताचे नाव आहे. त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### दुचाकीची धडक; पादचारी ठार

धुळे । मोराणेकडून धुळ्याकडे येणाऱ्या दुचाकीने (एमएच १८, बीवाय ९००८) पादचाऱ्यास धडक दिली. त्यात गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. बापू रावन मोरे (वय ४१, रा. चक्करबर्डी, धुळे) असे मृताचे नाव आहे. २४ जूनला संध्याकाळी साडेसातला सुरत बायपास रस्त्यावरील एका हॉटेलसमोर हा अपघात झाला. याप्रकरणी संतोष गटलू वाघ (रा. शिरधाणे ता. धुळे) यांच्या फिर्यादीवरून दुचाकीचालक महेश सुरेश शिंदे (रा. पळासनेर ता. शिरपूर) याच्याविरूद्ध धुळे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला.

# आ.काशिराम पावरा यांच्या हस्ते बुडकी येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन

शिरपूर । प्रतिनिधी



तालुक्यातील बुडकी येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन मंगळवार २७ जून २०२३ रोजी दुपारी १२ वाजता संपन्न झाले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते याही मोगी माता प्रतिमा पूजन करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते तसेच प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, भाजपा माजी तालुकाध्यक्ष राहुल रंधे, पंचायत समिती सभापती सौ. लता पावरा, सभापती प्रतिनिधी वसंत पावरा, माजी सभापती सत्तरसिंग पावरा, रमण पावरा, जयवंत पाडवी, सुभाष कुलकर्णी, जि. प. माजी सभापती सौ. मोगरा पाडवी, जि. प. सदस्य जताबाई पावरा, पंचायत समिती सदस्य सरिता पावरा, गटविकास अधिकारी एस. टी. सोनवणे, सरपंच इंदिराबाई विश्वास पावरा, विश्वास पावरा, उपसरपंच सचिन पावरा, भाईदास पावरा, निलेश महाजन, राजेंद्र पाटील, मनजीत पावरा, ग्राम विस्तार अधिकारी एस. एस. पावरा, ग्रामविकास अधिकारी जे. पी. पावरा, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी आमदार काशिराम पावरा म्हणाले, माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी गेल्या ३५ वर्षांमध्ये शिरपूर तालुक्याच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून खूप तळमळीने काम केले. यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. बुडकी ग्रामपंचायतची इमारत सुंदर व प्रशस्त बनविण्यात आली असून पदाधिकाऱ्यांचे मनापासून आभार. शिरपूर तालुक्यातील प्रत्येक पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य गावाचा विकास तसेच आपल्या भागातील विकास व्हावा यासाठी धडपड करत असतो, ही अभिमानाची व आनंदाची बाब आहे. भाईनी व मी तालुक्याच्या विकासासाठी सुमारे १ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन आणला. गेल्या अनेक वर्षांपासून आमदार कार्यालयात विकास योजना आपल्या दारी अभियान मार्फत तालुक्यातील जनतेला विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत आहे, यासाठी आमदार अमरिशभाई पटेल व भूपेशभाई पटेल यांचे सातत्याने मनापासून सहकार्याची भूमिका असते. सर्वांनी आपल्या मुला-मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे असे आवाहन आमदार काशिराम पावरा यांनी यावेळी केले.

उपस्थित सर्व मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच बोराडी ग्रामपंचायतीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल उपसरपंच राहुल रंधे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक रमण पावरा यांनी केले तर सूत्रसंचालन प्रविण शर्मा यांनी केले.



# आरटीई रकमेची परिपूर्ती तातडीने करा, गरीब मुलांना शाळा शिकू द्या- आप

### मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

नाशिक । प्रतिनिधी

मागील चार वर्षापासून आरटीई शिक्षण अंतर्गत शिक्षण देणाऱ्या शाळांचे अठराशे कोटी रुपये सरकारने दिले नसल्याने त्याचा परिणाम म्हणून गरीब वंचित घरातील मुलांना शैक्षणिक फटका बसत आहे. असे सांगत काल आम आदमी पार्टीने नाशिक जिल्हा शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांना निवेदन देवून त्यांच्या कार्यालयासमोर निदर्शने केली. दरम्यान मागणी मान्य न झाल्यास आंदोलन छेडण्यातील असाही इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

'एकीकडे राजकीय नेते मंडळीच्या मुलांचे शिक्षण पंचतारांकित शाळांत, परदेशात सुरू आहे. परंतु सरकार गरीब, वंचित घरातील मुलांचे शिक्षण व्हावे यासाठी मात्र निधी नाही असे सांगत हात वर करीत आहे' अशी टिका आपचे योगेश कापसे यांनी केली.

महाराष्ट्रातील खाजगी शाळांमध्ये वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पालकांची एक लाख मुले दरवर्षी शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत प्रवेश घेतात. आता २२-२३ शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून शासनाकडून गेल्या चार वर्षातील सुमारे अठराशे कोटी रुपये एवढी रक्कम शासनाने शाळांना न दिल्यामुळे अनेक ठिकाणी शाळा अडचणीत आल्या आहेत. दरवर्षी शासन दिरंगाई करीत असल्याने मुलांचे मोठे शैक्षणिक नुकसान होते आहे. यंदा पुन्हा तशीच वेळ आली आहे असा आरोप यावेळेस गिरीश उगले पाटील यांनी केला. फुले शाहू आंबेडकर यांचे नाव घेत राज्य करणाऱ्या शासनाच्या दरबारी मुलांना मात्र न्याय मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. संविधानाने दिलेल्या शिक्षण हक्काची पायमल्ली होते आहे. असे प्रतिपादन आपचे प्रसिद्धीप्रमुख चंदन पवार यांनी केले.

शासनाने या शाळांची थकीत शैक्षणिक शुल्क रक्कम आठ दिवसात अदा करून या लाखो मुलांचे शिक्षण सुरू ठेवावे अशी आम आदमी पार्टीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास अन्यथा आम आदमी पार्टी राज्यभर तीव्र आंदोलन करेल असा इशारा यावेळी देण्यात आला. निदर्शनात समन्वय समितीचे अध्यक्ष योगेश कापसे, गिरीश उगले पाटील, चंदन पवार, अमर गांगुर्डे, स्वेतांबरी आहेर, आदी कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# शिरपूर येथे भाजपा तर्फे मोदी @९ महासंपर्क अभियान अंतर्गत 'टिफिन बैठक' संपन्न

शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर येथे भाजपा तर्फे मोदी ९ महासंपर्क अभियान अंतर्गत 'टिफिन बैठक' माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. त्यामुळे साहजिकच सर्वांमध्ये जिव्हाळा आणि आपुलकी आहे. आज हीच आपुलकी पुन्हा एकदा दिसून आली. शिरपूर शहरात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानात मोदी ९ महासंपर्क अभियान अंतर्गत 'टिफिन बैठक' दि. १९ जून २०२३ रोजी संपन्न झाली.

तालुक्याचे आमदार काशिराम पावरा, भाजपा माजी प्रदेश उपाध्यक्ष बबनराव चौधरी, नंदुरबार लोकसभा संयोजक डॉ. तुषार रंधे, शिरपूर विधानसभा संयोजक प्रभाकरराव चव्हाण यांचा प्रमुख उपस्थितीत तालुकाध्यक्ष किशोर माळी, शहराध्यक्ष हेमंत पाटील यांनी या टिफिन बैठक' आयोजित केली होती.

या बैठकीला धुळे भाजपा जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, जिल्हा चिटणीस चंद्रकांत पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस संजय आसापुरे, भाजपा माजी जिल्हा कोषाध्यक्ष आबा धाकड, भाजपा तालुका चिटणीस सुनिल चौधरी, शहर सरचिटणीस महेंद्र पाटील, रोहित शेटे, शहर उपाध्यक्ष प्रशांत चौधरी, व्यापारी आघाडी शहराध्यक्ष नंदु माळी, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राज सिसोदिया, तालुकाध्यक्ष आकाश मराठे, यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# उडाणे येथील धर्मराज बागुल यांच्यातर्फे भाविकांना दिड टन केळी वाटप

धुळे । प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्ताने पंढरपूर येथे गेलेल्या भाविकांना धुळे तालुक्यातील उडाणे येथील ह.भ.प.धर्मराज बागुल, सामाजिक कार्यकर्ते यांच्यावतीने केळीचे वाटप करण्यात येणार आहे. पंढरपूर येथे भाविकांना केळी वाटपाचे हे दुसरे वर्ष आहे. त्यासाठी आज सुमारे दिड टन केली वाहनाने पंढरपूरकडे रवाना झाली आहे. त्या पाश्वभूमीवर माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या हस्ते दिड टन केळीने भरलेल्या वाहनाची पुजा करण्यात आली.



आषाढी एकादशीनिमित्ताने अखंड महाराष्ट्राचे दैवत पंढरपूर येथील विठ्ठल रुख्मीणीचे दर्शन आणि पायी दिंडी ही महाराष्ट्रातील जनतेसाठी धार्मिक पर्वणीच असते. त्या अनुषंगाने पंढरपुर येथे आषाढी एकादशीला लाखो भाविक दाखल होत असतात, दिंडी मार्गावर तसेच पंढरपुर येथे महाराष्ट्रातील असंख्य दानशुर व्यक्ती विविध प्रकारचे दान करीत असतात. अन्नदान,महाप्रसाद,फराळाचे वाटप, आरोग्य सेवा असे विविध उपक्रम राबविले जातात. त्या पार्श्वभूमीवर उडाणे ता.धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते ह.भ.प.धर्मराज बागुल यांच्यावतीने आषाढी एकादशी निमित्ताने गुरुवार दि.२९ जुन रोजी पंढरपूर येथे भाविकांसाठी फराळ म्हणून दिड टन केळीचे वाटप करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आज दि.२८ जुन रोजी सकाळी दिड टन केळीने भरलेले वाहन पंढरपूरकडे रवाना झाले.त्यानिमित्ताने माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या हस्ते सदर वाहनाची पुजा करण्यात आली. यावेळी माजी मंत्री पाटील यांनी भाविकांना शुभेच्छाही दिल्या. याप्रसंगी माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्यासोबत विशेष कार्य अधिकारी प्रकाश पाटील, ह.भ.प.धर्मराज बागुल,तालुका युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष हरिष पाटील,स्विय सहाय्यक सुनिल देशमुख,सतिष जोशी, रामकृष्ण पाटील,चुडामण पाटील,प्रणव पाटील, ज्येष्ठ नेते पोपट शिंदे, सोमनाथ बागुल, गोताणे माजी सरपचं भगवान पाटील,झुलाल पाटील,चिंचवार माजी सरपंच सोमनाथ पाटील, गोताणे सरपंच भूषण पाटील,राजू मोर,दिगंबर परदेशी,संजय बागुल आदी उपस्थित होते.

# भडणे येथील पोलीस पाटील युवराज माळी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

चिमठाणे । प्रतिनिधी



शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील आदर्श पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील युवराज मोहन माळी यांना नुकताच लोकराजा राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने नैसर्गिक मानव अधिकार सुरक्षा परिषद व क्रांतीज्योती प्रतिष्ठान नंदुरबार व रायबा बहुउद्देशीय संस्था धुळे यांच्यातर्फे धुळे येथील महापौर प्रतिभा चौधरी, नगरसेवक वंदना भामरे तसेच सामाजिक कार्यकर्ते गोपाल देवरे यांच्या उपस्थितीत मान्यवर उपस्थित समाज भूषण पुरस्कार देण्यात आला. त्यांचे निवडी बद्दल पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष छोटुलाल पाटील, उप अध्यक्ष किरण पाटील, तालुका अध्यक्ष प्रकाश पाटील शिवाजी पाटील संदेश देवरे किरण पाटील रवींद्र बेडसे विनय माळी आदींनी अभिनंदन केले.

# दह्याणे येथे छ.शाहू महाराज जयंतीनिमित्त वह्या व पुस्तकांचे वाटप

धुळे । प्रतिनिधी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्ताने जिल्हा परिषद मराठी शाळा दह्याणे ता.धुळे येथे गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तक व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



सामाजिक कार्यकर्ते किरण पवार आणि डॉ.दिवाकर मराठे यांच्यावतीने विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तके देण्यात आली होती. प्रारंभ छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे सरपंच सौ. अलका राजपुत यांच्या हस्ते पुजन करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जि.प.शाळेतील गरजु विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तके देण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात सरपंचा सौ.अलकाताई राजपूत, उपसरपंच रोहिदास पवार, एकनाथ पाटील,विठोबा पाटील,गोलू पाटील, गोपीनाथ पाटील,रमेश पाटील,देविदास पवार,साहेबराव राजपूत, दयाराम माळी, राजेंद्र राजपूत, भिमराव मोरे, बंडू पवार, कैलास राजपूत, कैलास पाटील, महेश पवार,बंडू सोनवणे,रावसाहेब पाटील यांच्यासह जि.प.शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक आदी उपस्थित होते.



# युनियन बँक ऑफ इंडियाचे पवननगरला जिजामाता मंडीत डिजिटल बँकिंग

नाशिक । प्रतिनिधी

युनियन बँक ऑफ इंडिया सार्वजनिक क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असून बँकेने डिजिटल बँकिंग क्षेत्रात विशेष कार्य केलेले आहे. डिजिटल बँकिंग मधील पुढचे पाऊल म्हणून युनियन बँक ऑफ इंडियाने नुकतेच पवननगर येथील जिजामाता मंडी येथे डिजिटल बँकिंग व्यवहार सुरू केले. यापुढे कुठलाही विक्रेता डिजिटल व्यवहाराद्वारे देवाण-घेवाण करू शकणार आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी शिवसेनेचे महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, सुनील पाटील, भाऊसाहेब नारायणे हे उपस्थित होते. युनियन बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रिय प्रबंधक सौरभ अग्रवाल, उपक्षेत्रीय प्रबंधक अमरनाथ गुप्ता, युनियन बँक ऑफ इंडियाच्या पवननगर शाखेचे शाखाप्रमुख यशवंत वाघ, नाशिक शहर शाखाप्रमुख तुषार चौरागडे, जितेंद्र सोनवणे, श्रीकांत पाटील, किशोर पाटील, परमजीत सिंग, ऋषी सिंग, मंगेश टिकार उपस्थित होते.

याप्रसंगी सौरभ अग्रवाल यांनी बँकेच्या विविध उत्पादनांची माहिती दिली. शिवाय बँकेचे व्योम प वापरून ३५० पेक्षा जास्त सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात बँकेतर्फे ग्राहकांना क्यू आर कोडचे वाटप करण्यात आले. युनियन बँकेच्या अधिकाऱ्यांनी स्वतः भाजीपाला खरेदी करून डिजिटल माध्यमातून त्याचे पेमेंट केले.

सौरभ अग्रवाल यांनी बँकेच्या इतरही योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना आवाहन केले, सुधाकर बडगुजर यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करून सर्व अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्यात. शिवाय सर्व भाजीपाला विक्रेते आणि नागरीक यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आवाहन केले. युनियन बँकेच्या अधिकाऱ्यांनी स्वतः भाजीपाला खरेदी करून डिजिटल माध्यमातून त्याचे पेमेंट केले.

# लुपिन फौंडेशन मार्फत सामुदायिक दिवस उत्साहात साजरा

धुळे । प्रतिनिधी



लुपिन फाउंडेशनकडून सडगाव गावात सामुदायिक दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.लुपिन लिमिटेडचे सर्वेसर्वा स्व.डॉ.देशबंधू गुप्ता यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्ताने त्याच्या जिवन कार्य व त्यांनी केलेल्या समाज कार्याविषयी माहिती देण्यात आली त्यात त्याचा जन्म ८ फेब्रुवारी १९३८ रोजी राजगढ अलवर(आताचे) राजस्थान येथे झाला त्यांनी १९६८ मध्ये पत्नीकडून पैसे उधार घेऊन ५००० च्या स्टार्ट-अप भांडवलासह लुपिनची स्थापना केली .

ल्युपिनचे पहिले कार्यालय मध्य मुंबईत भाड्याने घेतलेली जागा औषधे पाठवण्यासाठी वापरली गेली.दारिद्र्य रेषेखालील राहणार्या कुटुंबांचे उत्थान होते. ग्रामीण भारतातील दारिद्र्यरेषा, ग्रामीण विकासाचा हा दृष्टीकोन सर्वांगीण विकास कार्यक्रमांवर केंद्रित आहे जे पद्धतशीरपणे संधी आणि पायाभूत सुविधा निर्माण करतात, ग्रामीण भागातील लोकांना सक्षम बनवताना, सामाजिक-आर्थिक बदल घडवून आणतात आणि देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये ग्रामीण समुदायांचा समावेश सुनिश्चित करतात. राष्ट्रीय स्तरावर, लुपिन फाउंडेशन २.८ दशलक्ष लोकांच्या जीवनावर परिणाम करते त्यात राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गोवा, उत्तराखंड, गुजरात, जम्मू, आंध्र प्रदेश आणि सिक्कीम या ९ राज्यांमध्ये पसरलेल्या सुमारे ५००० गावांमध्ये राहतात. याचेच औचित्य साधून सडगाव गावात सामुदायिक दिवस साजरा करण्यात आला यात सर्व सर्वप्रथम ग्रामीण भागातील लोकांना आरोग्याविषयी माहिती देण्यात आली त्यात धुळे येथील सुप्रसिद्ध हृदयविकार तज्ञ डॉ.निखिल शिंदे यांनी असंसर्गजन्य आजारांबद्दल माहिती व उपचार या विषयावर मार्गदर्शन केले तसेच धुळे तालुक्यातील देवभाने येथील प्रकल्पातील महिला शेतकरी सुरेखा देसले यांनी त्यांच्या शेतात बि.सी.आय. प्रकल्पाच्या तत्त्वानुसार कापूस पिकावरील खर्च कमी करून उत्पादनात वाढ कशी केली जाते याची दखल जागतिक स्तरावर बी.सी.आय प्रकल्पाने घेतली व नेदरलँड देशातील अस्टरड्याम शहरात जागतिक कापूस परिषदेसाठी त्यांची निवड करण्यात आली होती. त्यांनी तेथील आपले अनुभव उपस्थित परिसरातील शेतकऱ्यांना सांगितले. या प्रसंगी लुपिन फाउंडेशन कडून तुषारा शंकरा यांनी त्यांचा सत्कार केला व तसेच तुषारा शंकर यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना स्वर्गीय डॉक्टर देशबंधू गुप्ता साहेब यांच्या जीवन कार्याविषयी माहिती व लुपिन फाउंडेशन कडून सुरू असलेल्या कार्यक्रमाविषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिल सैंदाने (बि.सी.आय.प्रकल्प प्रमुख) यांनी केले व चंदन टोकसे सर (बी.सी.आय प्रकल्प समन्वयक) यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व कुशावर्त पाटील (बी.सी.आय.प्रशिक्षण समन्वयक) यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमात सड्गांव गावाच्या सरपंच आशा मधुकर गर्दे, माजी सरपंच पांडुरंग जगन्नाथ गर्दे,आधार भिका खंडेकर,देवीदास मासुळे, भाईदास मासुळे, आबा शिंदे तसेच ग्रामस्थ, महिला , अंगणवाडी सेविका उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोद मासुळे सर (पी.यू व्यवस्थापक कुसुंबा), श्री.अविनाश बोरसे (पी.यू व्यवस्थापक म्हसदी), तसेच सर्व कृषीमित्र यांनी मदत केली, एकूणच कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.






# जातनिहाय जनगणना होईपर्यंत आपला लढा सुरू ठेवण्याची आवश्यकता : भुजबळ










नाशिक।
दोन देशात जातनिहाय जनगणना झाली तरच ओबीसी समाजाला आपले हक्क मिळतील आणि तेव्हाच आपल्या देशाची सहिष्णू, सौहार्दपूर्ण, धर्मनिरपेक्ष देश म्हणून प्रतिमा कायम राहील. असे सांगत देशात जोपर्यंत जातनिहाय जनगणना होत नाही तोपर्यंत आपला लढा निकराने सुरू ठेवावा लागेल. असे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले. माजी पंतप्रधान व्ही.पी सिंह यांच्या जयंतीनिमित्त दिल्लीच्या कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सामाजिक न्यायाचा वारसा हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या सोहळ्याच्या प्रारंभी छगन भुजबळ यांच्यासह मान्यवरांनी माजी पंतप्रधान आणि ओबीसींचा मसिहा म्हणून ओळखले जाणारे व्ही.पी. सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. याप्रसंगी जेडीयू खा.गिरिधरी यादव, सीपीआयचे डी राजा, डीएमके खासदार पी विल्सन, ज्येष्ट ओबीसी विचारवंत प्रो.कांचा इलाई, बीएसपी खा.कूनवर दानिश अली, जेएनयुच्या माजी कुलगुरू डॉ.शेफालिका शेखर, कार्यक्रमाचे आयोजक त्रुठ सिकर्स इंटरनॅशनल या संस्थेचे सुनिल सरदार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी फुले पगडी देऊन छगन भुजबळ यांचा आयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी छगन भुजबळ पुढे म्हणाले की, व्ही.पी. सिंह जयंती साजरी करण्यासाठी आज येथे उभा राहिल्याचा मला अभिमान वाटतो. आज व्ही. पी. सिंह यांची जयंती आहे, मात्र त्यांचे योगदान लोकांना का आठवत नाही? हा मोठा प्रश्न आहे. मागास समाजातील लोक त्याला का विसरले, हा चर्चेचा विषय असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. देशाच्या पंतप्रधान पदावर व्ही.पी.सिंह यांनी केवळ ११ महिने कारभार केला. परंतु याच काळात त्यांनी हजारो वर्षांपासून मागासलेल्या लोकांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी महत्वाची पावले उचलली. त्यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी देशात मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्या. त्यामुळे देशातील निम्म्या लोकसंख्येला म्हणजेच ओबीसींना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देऊन त्यांनी देशाची आणि समाजाची दिशा कायमस्वरूपी बदलून टाकली आणि भारतातील लोकशाहीचा विस्तार वंचितांपर्यंत पोहोचवला असेही ते म्हणाले. समतेवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांनी आतापासून आरक्षणविरोधी लोकांबरोबर संघर्ष करावा लागणार आहे. संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, ही मागणी पूर्ण होईपर्यंत हा लढा निकराने सुरू ठेवावा असे आवाहन त्यांनी केले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

गुरुवार, दि. २९ जून २०२३





# संतांच्या पालखी सोहळ्यासोबतच लाखो वैष्णवांच्या मेळ्याचा पंढरीत प्रवेश











विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन आणि शेकडो मैलांची पायपीट करीत आषाढी सोहळ्यासाठी पंढरपूरकडे निघालेले पालखी सोहळे आज पंढरीत प्रवेश करणार आहेत. त्यांच्यासोबत लाखोंचा महासागर पंढरीत दाखल होणार आहे. आळंदी येथून निघालेली संत ज्ञानेश्वर महाराज, देहू येथून निघालेले जगतगुरु तुकोबाराय, सासवड येथून निघालेले संत सोपानदेव, चांगा वटेश्वर यांच्यासह अनेक पालखी सोहळे काल अखेरच्या मुक्कामासाठी वाखरी येथील पालखी तळावर विसावले होते. या संताना निमंत्रण देण्यासाठी पंढरपूर येथून संत नामदेव राय पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर विसावा येथे येऊन थांबणार आहे. त एकनाथ महाराज पालखी सोहळा आणि त्रंबकेश्वर येथून निघालेला संत निवृत्तीनाथ यांचा पालखी सोहळा देखील परंपरेनुसार विसाव्याजवळ दाखल होणार आहेत.  सोपानकाकांचा आणि  त्यानंतर इतर पालखी सोहळे पंढरपूरकडे प्रस्थान ठेवतील. यानंतर जगतगुरु तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे निघेल. सर्वात शेवटी दुपारी संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान ठेवेल. माउली सोहळ्यातील पादुका वाखरीच्या ओढ्याजवळ मानकरी भाटे यांच्या रथात ठेवण्यात येतील. यानंतर इतर सर्व पालखी सोहळे विसाव्याजवळून पंढरपुरात प्रवेश केल्यावर पहिल्यांदा मानाच्या पालखी सोहळ्यापैकी संत नामदेव महाराजांचं पालखी सोहळा पंढरपूरकडे विसाव्यापासून प्रस्थान ठेवेल.

ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील